CNR NO.MHSO060005272024

**विशेष दिवाणी दावा क्र.६०/२०२४**

भारत सुगंधी (नगरकर), वगैरे

*विरुध्द*

एकनाथ खरे, वगैरे

## निशाणी क्र. १७ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज वादीने दाव्यात दुरुस्ती करण्याची परवानगी मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. वादीचे कथन आहे की, प्रतिवादी क्र.१ ते ७ दाव्यात हजर झालेले आहेत. प्रतिवादी क्र.८ यांस 'माणिक बलभिम खरे' या वादपत्रातील नावाने दाव्याचे समन्स काढण्यात आलेले होते. त्याचा अहवाल पाहता असे दिसते की, प्रतिवादी क्र. ८ च्या नांवात चूक आहे. याबाबत वादीने खात्री केली असता प्रतिवादी क्र.८ चे नांव 'मारुती बलभिम खरे' असे असल्याचे व वादपत्रात ते नांव 'माणिक बलभिम खरे' असे नमूद केल्याने प्रतिवादी क्र.८ वर समन्सची बजावणी झालेली नाही. त्यामुळे वादीस प्रतिवादी क्र.८ याचे नांवात वादपत्रात दुरुस्ती करण्याची परवानगी मिळण्याचा अर्ज दाखल करावा लागला आहे. करिता, अर्ज मंजूर करण्यात यावा.

२. प्रतिवादी क्र.१ ते ७ तर्फे म्हणणे मांडण्यात आले की, दावा दाखल केल्यानंतर विलंबाने प्रस्तुतचा अर्ज वादीने दाखल केलेला आहे. वादीचा उद्देश हा कामकाज प्रलंबित ठेवण्याचा आहे. अर्जातील मजकूर खरा व बरोबर नाही. करिता, अर्ज नामंजूर करण्यात यावा.

३. हजर विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. निशाणी क्र.१३ वरील प्रतिवादी क्र.८ च्या समन्सचा अहवाल विचारात घेण्यात आला. वादीने या अर्जासह प्रतिज्ञापत्र दिलेले असून त्यामध्ये स्पष्ट नमूद केले आहे की, प्रतिवादी क्र.८ च्या नांवाबाबत वादीने खात्री केलेली आहे. सदरील बाब पाहता प्रतिवादी क्र. ८ च्या नांवात दुरुस्ती करण्याची परवानगी वादीस

देणे योग्य होईल. करिता, खालील आदेश.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने प्रस्तावित दुरुस्ती १४ दिवसांच्या आत करुन दुरुस्त वादपत्र तसेच हुकूमनाम्याची प्रत दाखल करावी.

(खुल्या न्यायालयात घोषीत.)

NILESH SUBHASH BUDRUK
Digitally signed by NILESH SUBHASH BUDRUK
Date: 2024.12.10 12:00:43 +0530

दिनांक : ०९.१२.२०२४

(नीलेश सु. बुद्रुक)
सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर क्र. २,
पंढरपूर.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file are same word to word as per the original.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | Suresh M. Malkapalli |
| (b) | Court | : | 2$^{nd}$ Jt. Civil Judge (S.D.), Pandharpur. |
| (c) | Signed by P.O. On | : | 09.12.2024 |
| (d) | Uploaded on | : | 10.12.2024 |